RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

**Peer Reviewed**

# Akshar Wangmay

International Research Journal

**UGC-CARE LISTED**

## Folk Literature & Folk Media

FEBRUARY 2020













Executive Editor : Dr. Subash Nikam

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)

Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

Scanned with OKEN Scanner

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors | Page No. |
|---|---|---|
| 1 | लोकसाहित्य में लोकगीत<br>डॉ. योगिता हिरे | 9 - 12 |
| 2 | आदिवासी लोक सांस्कृति के संदर्भ में आदिवासी जनजीवन<br>डॉ.पंडित बन्ने | 13 - 16 |
| 3 | आदिवासी लोकसाहित्य और समाज जीवन<br>डॉ. योगिता दत्तात्रय घुमरे (उशिर) | 17 - 19 |
| 4 | गुजरात की लोकधारा भवाई एक संक्षिप्त अध्ययन :<br>डॉ. गीता परमार | 20- 23 |
| 5 | संत रामदासांच्या प्रार्थनांमधील 'विश्वात्मक कल्याण तत्व'<br>डॉ. सुरेश विनायक जाधव | 21-26 |
| 6 | लोकनृत्य<br>सौ. पूर्णिमा उमेश झेंडे | 27-30 |
| 7 | लेककथा: स्वरूप व वर्गीकरण<br>प्रा. रवींद्र मुरलीधर पगार | 31-34 |
| 8 | लोकसाहित्य आणि समाज जीवन<br>डॉ. विठ्ठल केदारी | 35-38 |
| 9 | महाराष्ट्रातील लोककला – गोंधळ<br>कु. हिरे सारिका जिभाऊ | 39-42 |
| 10 | 'तमाशा लोककलांचे आर्थिक अध्ययन'<br>डॉ.डी.एन.सोनवणे | 43-47 |
| 11 | लोकसाहित्य और संस्कृति<br>प्रा.रविंद्र पुंजाराम ठाकरे | 48-50 |





Scanned with OKEN Scanner

# 'तमाशा लोककलांचे आर्थिक अध्ययन'

डॉ.डी.एन.सोनवणे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
निमगांव,ता.-मालेगाव,जि.-नाशिक

**प्रस्तावना-:**

तमाशाही सांस्कृतिक लोककला असून सामाजिक व धार्मिकही आहे. १७ व्या शतकापासून लोकरंजनातून प्रबोधन,लोकशिक्षण करण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे (प्रबोधनकार ठाकरे). सामाजिक, सांस्कृतिक इतिहास जतन करण्यात महत्त्वाचे साधन ठरलेले आहे.आजच्या बदलत्या संदर्भात तमाशा या कलेकडे अठरा पगड जातींना उभी केलेली, उपेक्षित जातींनी जतन केलेली व समाजातील उच्चभ्रू आणि सवर्ण जातींनी आश्रय देऊन विकसित केलेली लोककला आहे.

तमाशा हा मूळ शब्द पर्शियन असून तो उर्दू भाषेतून मराठीभाषेत रूढ झाला.(नामदेव व्हटकर) त्याचा अर्थ दृश्य खेळ, नाट्यप्रयोग असा आहे.तमाशा म्हणजे ज्याच्यामुळे तमाची म्हणजे पापाचरणाची आस लागते. असा कला प्रकार म्हणजे तमाशा.(मराठी विश्वकोष).नाच्या पोरांचा तमाशा म्हणजे तमाशा (लक्ष्मण जाधव) गण, गवळण, फार्स, सवाल, जवाब, रंगबाजी व वग हे तमाशाचे पाच रंग आहेत. तमाशाचे खेळ यात्रा,जत्रा व उत्सवांमध्ये उघड्यावर किंवा तंबूत होत असतात. तमाशात काम करणारे स्त्री-पुरुष वेशभूषा करून आपली कला सादर असतात. सुरूवातीच्या काळात पुरूष कलाकार स्त्री वेष परिधान करून स्त्री पात्र सादर करीत होते. ०८ ते १० कलाकार घेऊन बैलगाडीवर एका गावातून दुसऱ्या गावी सादरीकरणासाठी प्रवास केला जात होता. धान्य व जेवन स्वरूपात बिदागी दिली जात होती. नंतरच्या काळात एक रुपया तिकीटावर तमाशा केला जात होता. परंतु गेल्या पन्नास वर्षांत बदलते तंत्रज्ञान आणि प्रेक्षकांच्या आवडी निवडीनुसार तमाशाचे स्वरूप बदलले आहे. आता स्त्री- पुरुष कलाकारांचे प्रमाण ५० ते १०० असून प्रोडक्शन हाऊस सारखा तमाशा फड असे रूपांतर झाले आहे. त्यामुळे तमाशा वरील खर्चाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामानाने उत्पादनात वाढ होत नाही म्हणून अनेक तमाशा मंडळ आर्थिक संकटात सापडल्याने सावकारशाही तून निर्माण होणारा कर्जबाजारीपणा, कलावंतांचे निकृष्ट जीवनमान, व्यवसाय नियोजनाचा व योग्य धोरणाचा अभाव, व्यसनाधीनता, वाढती अनैतिकता या समस्यांमुळे कला म्हणून तमाशा किती उरला आणि व्यवसाय म्हणून कुठे चालला आहे हे चिंतेचे



Scanned with OKEN Scanner

विषय आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात तमाशा एक लोककला,तमाशाच्या आर्थिक समस्या, तमाशाच्या निकोप वाढीसाठी उपाययोजना विषयाचे अध्ययन मांडण्यात आलेले आहे.

सूचक शब्द-: तमाशा, लोककला, आर्थिक समस्या.

**शोधनिबंधांची उद्दिष्टे-:**

- तमाशा कलावंतांच्या आर्थिक समस्या जाणून घेणे.
- तमाशा व्यवसायाच्या निकोप वाढीसाठी उपाययोजना सुचविणे

**संशोधन पद्धती-:**

तमाशा लोककलेचे आर्थिक अध्ययन प्रस्तुत विषयावरील शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन स्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. माहिती पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे व वेब पेजेस या स्रोतांद्वारे मिळवलेल्या माहितीची मांडणी करण्यात आलेली आहे.

**विषयप्रवेश-:**

महाराष्ट्र राज्य हे सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न राज्य आहे. महाराष्ट्रात जागरण- गोंधळ, भारुड, भजन, कीर्तने याद्वारे लोककलावंत धार्मिक विधी व मनोरंजन करत होती. परंतु यामध्ये मनोरंजनास मुक्तपणे वाव नव्हता म्हणून लोककलाकारांना मर्यादा पडू लागल्या. १७ व्या शतकात मुस्लिम फौजांचे मनोरंजन करण्यासाठी लोककलाकारांनी गंमत, खेळ या प्रकारात सुरुवात केली मुस्लिम सरदार आणि फौजा लोककलाकारांच्या मनोरंजनात्मक खेळास तमाशा म्हणून संबोधू लागले. पेशवे काळात मराठी कलाविष्कारास तमाशा नावाने चांगले दिवस लाभले. त्या काळात तमाशाचे स्वरूप ओबड धोबड होते. उमा माग, सावळजकर आणि हैबती गाडगे, पुसे सावळेकर यांच्या रुपाने आधुनिक रूपात तमाशाचा उदय झाला. गण - गवळण, फार्स, रंगबाजी, लावणी, वगनाटय़ हे पंच रूप असलेला तमाशा पूर्वरंग व उत्तररंग स्वरूपात विभागला गेला. पश्चिम महाराष्ट्रात ढोलकी फडाचा तमाशा तर उत्तर महाराष्ट्रात देशी तमाशा, विदर्भात खडीगंमत, मराठवाड्यात बालेघाटी तमाशा नावाने नावारूपाला आला. त्यातून तमाशाचे तंबू, मातीचा तमाशा आणि संगीत बारीचा तमाशा असे परंपरागत प्रकार विकसित झाले. मात्र आजच्या चित्रपट, नाटक या स्पर्धेत मोबाइल आणि त्यावरील फ्री डाटाच्या युगात परंपरागत तमाशाचे स्वरूप नाईलाजास्तव बदलत जाऊन आज संगीत बारी, चौफुला सारखे चित्रपट व नाच गाण्यांचे तमाशा असे आधुनिक



Scanned with OKEN Scanner

स्वरूप प्राप्त झाले. मात्र तमाशा लोककला स्पर्धेच्या, रोषणाईच्या, डिजिटल युगात उतरती कळा अनुभवत आहे. तमाशा लोककला आज अभूतपूर्व आर्थिक संकटातून जात आहे.

**तमाशा व्यवसायापुढील आर्थिक समस्या**

- **कर्जबाजारीपणा**: बदलते तंत्रज्ञान आणि प्रेक्षकांच्या आवडी निवडीनुसार तमाशाचे स्वरूप बदलत आहे. तमाशाचा फड हा प्रोडक्शन हाऊस सारखा बनत असल्याने प्रत्येक तमाशात किमान तीस ते चाळीस कलाकारांचा ताफा, कलाकारांना द्यावी लागणारी उचल, वाहतूक, साजशृंगार, साहित्य यासारख्या बाबींवर फड मालकास लाखो रुपये खर्च करावे लागतात. बँका आणि वित्त संस्था त्यासाठी कर्जपुरवठा करीत नाही. त्यामुळे सावकारी कर्जाचा आधार घ्यावा लागतो. कर्जाचे स्वरूप खूप महाग असते. कर्जफेड इतके उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे प्रत्येक तमाशा मालकांवर २० ते २५ लाखांचे कर्ज निर्माण झाले आहे. असे तमाशा संघटनेचे राज्याचे उपाध्यक्ष तानाजी भोसले यांचे मत आहे.
- **अनुदानाचा अभाव**: तमाशा कलाकारांना जगणे सुसह्य व्हावे यासाठी समाजकल्याण विभागाच्यावतीने कलाकारांना सहाशे रुपये अनुदान दिले जाते. तमाशा कलाकारांच्या बाबत शासन नेहमी उदासीन असल्याने गेल्या दहा वर्षात अनुदानात वाढ करण्यात आलेली नाही. गेल्या चार वर्षांत अनुदान मिळालेली नाहीत. प्रत्येक जिल्ह्याच्या तमाशा मंडळ संघटनेला तीन वर्षांत आठ लाखांचे पॅकेज देण्यात आले मात्र मागील तीन वर्षात फक्त एकच वेळा पॅकेज मिळाले.
- **नोटाबंदीचा फटका**: खान्देश लोककला अकादमीचे अध्यक्ष श्री शेषराव गोपाळ यांच्यामध्ये खान्देशातील दुष्काळी परिस्थिती आणि त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नोटाबंदीची घोषणा यामुळे कार्यक्रमांचे रोखीने पैसे मिळत नाहीत. नोटाबंदीचा यात्रा व जत्रा यावर गंभीर परिणाम होऊन लोकनाट्य तमाशा मंडळाचा व्यवसाय पूर्णपणे बुडाला आहे. खान्देशातील बावीस तमाशा मंडळांची आर्थिक स्थिती खालावून त्यांनी गाशा गुंडाळला आहे. राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या मंगला बनसोडे यांच्या मते नोटाबंदीमुळे तमाशा कला रसातळाला जायला लागली आहे.
- **खालावलेली प्रतिष्ठा:** लोकांचे मनोरंजन करण्याचे प्रमुख साधन असताना तमाशा कलावंत मात्र कायमस्वरूपी दुर्लक्षित राहिलेला आहे. नाटक, सिनेमा क्षेत्रातील कलावंतांना मिळणारी प्रतिष्ठा व प्रसिद्धी तमाशा कलावंतांना मिळत नाही. तमाशात काम करणाऱ्या कलाकारांकडे तुच्छ नजरेने पाहिले जाते. तमाशा कलाकारांना समाजात कुठलाही मान सन्मान मिळत नाही. उलट समाजात या कलाकारांची हेटाळणी केली जाते.
- **निकृष्ट जीवनमान:** अनेक दशकांपासून तमाशाने लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. कलेच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. परंतु कलावंतांना मात्र

पोटभर चांगले अन्न सुद्धा मिळत नाही. हंगामी किंवा तात्पुरत्या स्वरूपाचे काम असल्याने पुरेसे उत्पन्न मिळत नाही. शिक्षण नाही, पैसा नाही आणि उमेदीचे वय संपले की आयुष्याची परवड सुरू होते. महिला कलाकार, ब्यक स्टेज आर्टिस्ट, साथसंगत करणारे कलाकार, गायक, सोंगाड्या या सर्वांचे फार हाल होतात. कुटुंबात कोणीही विचारत नाही, कोणी मदत करत नाही, अशा स्थितीत अत्यंत नित्कृष्ट अंधारात उपेक्षित जीवन जगत असतात.

- **आचारसंहितेचा व्यवसायास फटका**: राज्यातील लोकशाही व्यवस्थेअंतर्गत सततच्या निवडणुका होण्यासाठीची आचारसंहिता, तसेच शहरातील रात्री दहा नंतरची बंदी, यामुळे पोलीस प्रशासनाकडून कार्यक्रमास परवानगी मिळणे अवघड असते त्यामुळे यात्रा कमिट्या तमाशा मनोरंजनापेक्षा इतर कार्यक्रमांवर भर देताना दिसून येतात. तमाशा मनोरंजनाचे कार्यक्रम कमी होत आहेत.
- **वाढती व्यसनाधिनता**: कार्यक्रमाच्या निमित्ताने सततचे जागरण, एका गावावरून दुसऱ्या गावी होणारा प्रवास, संगत - सोबत, सततची आर्थिक विवंचना, कौटुंबिक विस्कळीतपणा यासारख्या कारणांमुळे कलाकारांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढलेले आहे.
- **उपाययोजना -:**
- मंगला बनसोडे यांच्या मते, शासनाला लोककला व संगीत पार्टीमधला फरक कळत नाही. संगीत पार्ट्यांना तमाशा समजून कला सादरीकरणासाठी विदेशी पाठवणे ऐवजी तमाशा कलाकारांना प्राधान्य देऊन परदेशी पाठवावे.
- शासनाचे अनुदान खोट्या फड मालकांना मिळते. खोट्या फड मालकांवर कारवाई करून योग्य त्या तमाशा कलाकारांना शासनाची मदत मिळण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.
- तमाशा कलाकारांना स्थानिक टपोऱ्या पोरांचा, गाव गुंडांचा जाच सहन करावा लागतो. म्हणून तमाशा कार्यक्रमांच्या वेळी पोलीस संरक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी.
- तमाशा कलाकारांचे उतारवयातील उपेक्षित जीवन सावरण्याच्या हेतूने त्यांना आर्थिक आधार देण्यासाठी वयाच्या ६० वर्षांनंतर पेन्शन मिळण्याची व्यवस्था शासनाच्या वतीने करण्यात यावी.
- तमाशा कलावंतांच्या मुलांची शिक्षण विषयक परवड होते. अल्प शिक्षणामुळे किंवा निरक्षरतेमुळे अर्थार्जनास वाव मिळत नाही. म्हणून शासनाने तमाशा कलाकारांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय अर्थात शाळा सुरू करणे.
- तमाशा फडाचे थकीत अनुदान अदा करण्यात यावे व नियमित अनुदान अदा करण्याची व्यवस्था सक्षम करण्यात यावी.
- तमाशा ही लोककला जिवंत ठेवण्याचा हेतूने शासनाने तमाशा विषयी आस्था दाखवून पॅकेजची व्यवस्था करून तमाशा पॅकेजमध्ये वाढ करण्यात यावी.



Scanned with OKEN Scanner

- सावकारी कर्जाचा पाश तोडून तमाशा व्यवसाय सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी बँकांनी तमाशा फडास कर्जपुरवठा करणे, व्याज सवलत व अनुदान स्वरूपात कर्जाची उपलब्धता करून देणे.
- तमाशा कलावंतांनी, फड मालकांनी शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या तमाशा शिबिरात सहभाग घ्यावा.
- तमाशा व्यवसायातील बदलते तंत्रज्ञान व कला, कौशल्य यांचा अवलंब करण्यासाठी तमाशा परिषदेला अधिक बळकटी देण्यात यावी.
- तमाशातील महिला कलावंतांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणेसाठी त्यांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे.

**सारांश**-:

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवातील तमाशा ही लोककला ग्रामीण भागातील लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक, लोकशिक्षणाचे प्रमुख साधन आहे. आज अनेक आर्थिक समस्यांमध्ये तमाशा ही लोककला अडकून पडलेली आहे. म्हणून आर्थिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज आहे.

**संदर्भ सूची** -:


- अचलखांब रुस्तुम, तमाशा लोकरंगभूमी (२००६),सुगावा प्रकाशन, पुणे.
- कसबे मिलिंद, आधुनिक तमाशा : सामाजिक आणि वाङ्मयीन अभ्यास(२००४),पुणे.
- जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश (१९९७),महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक सा. स. मंडळ, मुंबई.
- जोशी वि.कृ., लोकनाटयाची परंपरा (१९९६), ठोकळ प्रकाशन, पुणे.
- व्यवहारे शरद, लोकरंजनाची परंपरागत माध्यमे (२००२),स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
- दैनिक लोकमत, हॅलो पुणे - तमाशाचे आता वाजले बारा, १४ मार्च २०१०.
- दैनिक लोकमत, हॅलो पुणे - तमाशातील महिला कलावंतांना सन्मानाने वागवा, ११ एप्रिल २०१२.
- सामना ऑनलाईन - ६ मे २०१७.
- Maharashtratimes.india times.com
- www.mns.org
- www.wikipedia.tamasha.




Scanned with OKEN Scanner